सोलापूर तरुण भारत

# सदाफुली

https://dainiktarunbharat.com
https://epaper.dainiktarunbharat.com

बुधवार, २१ जानेवारी २०२६

आतील पानावर

पान २– पीआर गेमवर तापसी पन्नू भडकली
पान ३– तमन्नाने एका गाण्यावर ठेक्यासाठी घेतले...
पान ४– दाक्षिणात्य अभिनेत्रीची बॉलिवूडमध्ये एन्ट्री?
पान ५– प्रियदर्शिनी 'या' सिनेमातून येणार भेटीला
पान ६ – इंडस्ट्रीत आजही हिरोची पूजा केली जाते




# शाहिद कपूरचा खतरनाक अवतार!

बॉलीवूड अभिनेता शाहिद कपूर त्याच्या आगामी 'ओ रोमिओ' चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित झाल्यानंतर आता टीझरही प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. या टीझरमध्ये शाहीद कपूरच्या अनोख्या लूकने लक्ष वेधून घेतले आहे. शाहिदच्या खतरनाक लूकमुळे चाहत्यांमध्ये चित्रपट पाहण्यासाठी उत्सुकता प्रचंड वाढली आहे. हा चित्रपट १३ फेब्रुवारी २०२६ या दिवशी देशभरातील चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे प्रदर्शन व्हॅलेंटाईनडेच्या पूर्वसंध्येला होणार असल्याने ते खूप खास असणार आहे. हा ॲक्शन-थ्रिलर आणि रोमँटिक चित्रपट आहे. या चित्रपटाचे दिग्दर्शन विशाल भारद्वाज यांनी केले आहे.

शाहिद कपूरसोबत चित्रपटात तगडी स्टारकास्ट असून, अभिनेत्री तृप्ती डिमरी मुख्य भूमिकेत झळकणार आहे. याशिवाय विक्रांत मैसी, दिशा पाटनी, तमन्ना भाटिया, अविनाश तिवारी, फरीदा जलाल, दिग्गज अभिनेते नाना पाटेकर, रणदीप हुडा, दिशा पटानी आणि फरीदा जलाल या कलाकार मंडळींच्या देखील महत्वाच्या भूमिका आहेत. या टीझरमध्ये शाहिदच्या शरीरावर टॅटू, डोक्यावर टोपी आणि हातात बंदूक अशा अनोख्या लूकमध्ये तो वावरताना दिसत आहे.

दिग्दर्शक विशाल भारद्वाज पुन्हा एकदा काहीतरी वेगळे आणि हटके घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला या चित्रपटाच्या माध्यमातून येत आहे. १ मिनिट ३५ सेकंदाच्या या टीझरमध्ये चित्रपटाचे कथानक काय असू शकते हे समजत नाही. मात्र, चित्रपटातील पात्रांची छोटी झलक पाहायला मिळते. यापूर्वी विशाल भारद्वाज आणि शाहिद कपूर या दिग्दर्शक-अभिनेता जोडगोळीने कमिने, हैदर, आणि रंगून असे वेगळ्या धाटणीचे चित्रपट चित्रपटसृष्टीला दिले आहेत. पुन्हा एकदा ही जोडी ओ रोमिओ चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.



# नोरा फतेहीला मिळाला तिचा 'दिलबर'

नोरा फतेहीने 'साकी-साकी', 'दिलबर' आणि 'कुसु-कुसु' या गाण्यांद्वारे बॉलिवूडमध्ये स्वत:चे स्थान निर्माण केले आहे. नोरा सातत्याने आंतरराष्ट्रीय संगीत जगत आणि बॉलिवूडमध्ये वाढत्या लोकप्रियते दरम्यान संतुलन साधत आहे. अभिनेत्रीला आता तिचा जोडीदार मिळाला आहे. या जोडीदारासोबत वेळ घालविण्यासाठी नोरा सातत्याने प्रवास करत आहे. नोराने २०२२ साली फीफा वर्ल्डकपमध्ये परफॉर्म पेले होते. फुटबॉलशी तिचे जुने नाते आहे, परंतु आता फुटबॉलरने तिचे मन जिंकले आहे. नोरा फतेही एका कोट्याधीश फुटबॉलरला डेट करत असून त्याच्यावरील प्रेमापोटी ती आफ्रिकन कप ऑफ नेशन्समधील एका फुटबॉल सामन्यासाठी ती मोरक्को येथे पोहोचली होती. नोराला या फुटबॉलरसोबत मोरक्कोमध्ये अनेकदा एकत्र पाहिले आहे. नोरा स्वत:चे नाते खासगी ठेवू इच्छित असल्याने तिने यासंबंधी वाच्यता केलेली नाही. नोराचे नाव यापूर्वी प्रिन्स नरुलासोबत जोडले गेले होते. तसेच अंगद बेदी, टेरेन्स लुईससोबतही ती रिलेशनशिपमध्ये होती.



# ॲनिमल २ कधी येणार?

अभिनेता रणबीर कपूरची मुख्य भूमिका असलेला 'ॲनिमल' हा चित्रपट २०२३ मध्ये बॉक्स ऑफिसवर प्रदर्शित झाला होता. या चित्रपटाने मोठा इतिहास रचत कमाईच्या बाबतीत अनेक चित्रपटांना मागे टाकले. २०२३ मध्ये सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटाचा बहुमान ॲनिमलने मिळवला. या चित्रपटाने ९१७ कोटींची दमदार कमाई केली. त्यानंतर या ॲक्शन चित्रपटाचा सिक्वल कधी हेणार याची उत्सुकता सर्वांना लागली होती. याबाबत चित्रपटात रणबीर कपूरच्या ऑनस्क्रीन बहीणीची व्यक्तिरेखा साकारणारी अभिनेत्री सलोनी बत्रा हिने एक मोठी हिंट दिली आहे. अभिनेता रणबीर कपूरच्या करिअरला कलाटणी देणारा चित्रपट म्हणून ॲनिमलकडे पाहिले जाते. चित्रपटातील त्याच्या अभिनयाने प्रेक्षकांना विचार करण्यास भाग पाडले. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत सलोनी बत्रा हिने ॲनिमल २ बाबत भाष्य केले आहे. ॲनिमल चित्रपटाच्या सिक्वलला ॲनिमल पार्क असे नाव देण्यात आले आहे. पण सध्या तरी ॲनिमल २ असेच सिक्वलला म्हटले जात आहे. अभिनेत्री सलोनी बत्रा हिची भय नावाची वेबसिरीज ॲमेझॉन मिक्सवर प्रदर्शित झाली असून, या वेबसिरीजच्या निमित्ताने ती मुलाख देत आहे. मुलाखतीत तिला ॲनिमल २ कधी येणार असा प्रश्न विचारण्यात आला होता. त्यावर मी ॲनिमल चित्रपटाच्या सिक्वेलमध्ये आहे. प्रेक्षकांनी ॲनिमल चित्रपटाला भरभरून प्रेम दिलं. ॲनिमल चित्रपट सुपरहिट ठरला. ॲनिमल २ चित्रपटातही अधिक ॲक्शन आणि मनोरंजनने परिपूर्ण असेल, असे सलोनीने म्हटले आहे. तसेच अभिनेत्रीने मुलाखतीत तिच्या करिअरच्या प्रवासाविषयी देखील माहिती शेअर केली आहे. दरम्यान, मीडिया रिपोर्ट्सनुसार हा चित्रपट २०२७ मध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. दुसऱ्या भागाचे दिग्दर्शनही संदीप रेड्डी वांगा करत आहेत. सध्या ते स्पिरीट चित्रपटात व्यस्त असून हा चित्रपट ऑनफ्लोअर आहे. दाक्षिणात्य अभिनेता प्रभास या चित्रपटात मुख्य भूमिकेत आहे.

# पीआर गेमवर तापसी पन्नू भडकली



अभिनेत्री तापसी पन्नू आपल्या दमदार अभिनयासोबतच स्पष्ट आणि बेधडक मतांसाठी ओळखली जाते. महिला-केंद्रीत चित्रपटांमधील भूमिकांमुळे चर्चेत असलेली तापसी बॉलिवूडमधील पीआर गेमवर टीका करताना दिसली आहे. एका मुलाखतीत तापसी म्हणाली की, गेल्या दीड-दोन वर्षांत इंडस्ट्रीतील पीआर गेमप्रचंड वाढला आहे. पूर्वी स्वत:ला पुढे नेण्यासाठी पीआर केला जायचा, पण आता इतर कलाकारांना खाली पाडण्यासाठीही पैसे दिले जात आहेत, असं तिनं स्पष्टपणे सांगितलं. तापसी पुढे म्हणाली, मला हे समजत नाही की एखाद्याचं यश दुसऱ्याच्या अपयशावर कधीपासून अवलंबून झालं? लोक चर्चेत राहण्यासाठी आपला खरा स्वभाव लपवून वेगळाच चेहरा दाखवत आहेत. तिनं हेही स्पष्ट केलं की, मी फक्त एखादा हिट चित्रपट मिळाल्यामुळे खूश होत नाही.

मला माझी स्वत:ची, ठामआवाज असलेली ओळख हवी आहे. पैसे देऊन लेख छापून घेण्यापेक्षा, स्वत:वर आणि माझ्या माणसांवर पैसे खर्च करणं मला जास्त योग्य वाटतं. वर्कफ्रंटबद्दल बोलायचं झालं, तर तापसीने २०१० मध्ये तेलुगू चित्रपटातून अभिनय कारकिर्दीची सुरुवात केली होती. बॉलिवूडमध्ये ती 'चश्मे बद्दूर'मधून झळकली. तिचा आगामी चित्रपट 'गांधारी' असून तो ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणार आहे.



# तमन्नाने एका गाण्यावर थिरकण्यासाठी घेतले 'इतके' कोटी

तमन्ना भाटिया बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. अभिनयासह ती तिच्या नृत्यासाठीही ओळखली जाते. मोठ्यांपासून लहानांपर्यंत सर्वजण तिच्या गाण्यांवर थिरकताना दिसतात. तमन्ना भाटियाने अनेक दाक्षिणात्य आणि हिंदी चित्रपटांमध्ये काम केलं आहे. येत्या काळातही ती एका वेगळ्या भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. तर अलीकडे ती तिच्या 'आज की रात', 'गफूर' यांसारख्या गाण्यांमुळे चर्चेत राहिली. तमन्ना बॉलीवूडमधील अशा अभिनेत्रींपैकी एक आहे, ज्या त्यांच्या नृत्यशैलीसाठी सुद्धा ओळखल्या जातात. पण तुम्हाला माहीत आहे का, तम्मनाने ३१ डिसेंबर २०२५ रोजी गोवा येथील एका क्लबमध्ये नाचण्यासाठी तिनं कोट्यवधी रुपये घेतल्याची चर्चा सुरू आहे. वर्षाच्या शेवटच्या दिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पार्टीतील ६ मिनिटांच्या गाण्यावर तमन्ना थिरकली आणि ती फक्त थिरकलीच नाही, तर तिनं तिच्या नृत्यशैलीनं अनेकांची मनं जिंकली. सध्या तिचा हा डान्स व्हिडीओ व्हायरल होत आहे. तमन्नाचा निळ्या रंगाच्या ड्रेसमधील डान्स करतानाचा व्हिडीओ व्हायरल होत आहे.

अभिनेत्रीने सहा मिनिटांच्या या गाण्यावर क्लबमध्ये डान्स करण्यासाठी एक-दोन नव्हे, तर तब्बल सहा कोटी रुपये मानधन घेतलं असल्याचं म्हटलं जातंय. त्यामुळे तमन्ना अनेकांच्या चर्चेचा विषय ठरली आहे. माध्यमांच्या वृत्तानुसार तमन्ना भाटियानं आर्यन खानच्या 'बॅड्स ऑफ बॉलीवूड'मधील आयटम साँगसाठीही तब्बल सहा कोटी मानधन घेतल्याचं म्हटलं जातं. तर 'आज की रात' या तिच्या हिट गाण्यासाठी तिनं एक कोटी रुपये घेतले होते. त्यानंतर अजय देवगणच्या 'रेड २'मधील 'नशा' गाण्यासाठी तिनं एक कोटी रुपये घेतले होते. त्यामुळे गाण्यांच्या माध्यमातून तमन्ना कोट्यवधींची कमाई करीत असल्याचं स्पष्ट झालंय. दरम्यान, तमन्ना येत्या काळात भारतीय सिनेसृष्टीतील दिवंगत दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या चरित्रपटात झळकणार आहे. त्यामधून ती व्ही. शांताराम यांच्या दुसऱ्या पत्नीची भूमिका साकारणार आहे आणि अभिनेता सिद्धार्थ चतुर्वेदी व्ही. शांताराम यांची भूमिका साकारणार आहे.




# 'हिरो नंबर वन येतोय

अभिनेता गोविंदा गेल्या अनेक वर्षांपासून चित्रपटांपासून दूर आहे. चाहते त्याला पडद्यावर पाहण्यास उत्सुक आहेत. आता, सलमान खानच्या बॅटल ऑफ गलवान या चित्रपटात गोविंदाने कॅमिओ साकारल्याच्या बातम्या पसरत आहेत. गोविंदाने एका कार्यक्रमात यावर प्रतिक्रिया दिली आणि तो लवकरच पुनरागमन करणार असल्याचे उघड केले. गोविंदाने जय श्री राम चा जयघोष केला. त्यानंतर, तो त्याच्या पुनरागमनाबद्दल बोलला. गोविंदा म्हणाला, मी तुला असे काही सांगणार आहे जे मी यापूर्वी कधीही सांगितले नव्हते. वेदना आणि भीती गेली आहे. आणि आता तुझा हिरो, जो हिरोपासून हिरो नंबर वन बनला आहे, तो येत आहे. तू नेहमीच तुझे प्रेम माझ्यासोबत ठेव. गोविंदा पुढे म्हणाला, मी तुमच्या सेवेत आहे. मी तोच गोविंदा आहे जो गरिबीतून आला आहे. माझ्याकडे कधीही कोणत्याही प्रकारचे नियोजन नव्हते; फक्त देव आणि माझ्या पालकांच्या आशीर्वादाने मला गोविंदपासून गोविंदा बनवले. तुमच्या प्रेमाने हे घडवून आणले. तो गोविंदा परत येत आहे. हनुमान मला आशीर्वाद देवो. यानंतर गोविंदाने भजनही गायले. गोविंदा त्याच्या वैयक्तिक आयुष्यामुळे देखील चर्चेत आहे. काही काळापूर्वी गोविंदा आणि त्याची पत्नी सुनीता आहुजा यांच्यात दुरावा निर्माण झाल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. तथापि, सुनीता यांनी स्वतः या वृत्तांचे खंडन केले. गोविंदाचे एका अभिनेत्रीसोबत प्रेमसंबंध असल्याच्या बातम्याही आल्या होत्या. सुनीता आहुजा यांनीही या वृत्तांचे खंडन केले आणि म्हटले की, गोविंदाचे कोणत्याही अभिनेत्रीसोबत प्रेमसंबंध नाही. अभिनेत्री अशा घाणेरड्या गोष्टी करत नाहीत.

# 'देसी गर्ल'चा 'द ब्लफ'तील ॲक्शन अवतार

अभिनेता बॉलिवूडची 'देसी गर्ल' अर्थात प्रियंका चोप्राने हॉलिवूडमध्ये मोठे यश मिळवले आहे. लवकरच ती 'द ब्लफ' या हॉलिवूड चित्रपटात दिसणार आहे. यात ती समुद्री डाकूच्या भूमिकेत दिसणार आहे. नुकताच या चित्रपटातील दमदार लुक शेअर करण्यात आला आहे.

या चित्रपटातील लुकमध्ये प्रियंका रक्ताने माखलेली असून, हातात बंदूक धरलेली दिसते. तर दुसऱ्या एका फोटोतील तिचा ॲक्शन अवतार अधिकच प्रभावी वाटतो. प्रियंकाचा हा ॲक्शन अवतार अनेकांच्या पसंतीस पडत आहे. तिच्या या लुकवर अनेकांकडून लाइक आणि कमेंटचा वर्षाव होत आहे. निकने देखील इन्स्टाग्रामस्टोरीवर प्रियंकाचा लूक शेअर करत तिचं कौतुक केलं., 'या चित्रपटात प्रियंका किती अद्भुत आणि शक्तिशाली आहे, हे जगानं पाहावं, याची मी आतुरतेने वाट पाहत आहे,' असे त्याने प्रियंकासाठी म्हंटले आहे. या चित्रपटात प्रियंकासोबत कार्ल अर्बन, टेमुएरा मॉरिसन आणि इस्माइल क्रूझ कॉर्डोवा यांसारखे आंतरराष्ट्रीय कलाकार दिसणार आहेत. रुसो ब्रदर्स निर्मित आणि फ्रँक ई. फ्लॉवर्स दिग्दर्शित हा चित्रपट २५ फेब्रुवारी रोजी थेट प्राइमव्हिडीओवर प्रदर्शित होणार आहे.



# दाक्षिणात्य अभिनेत्रीची बॉलिवूडमध्ये एन्ट्री?

लोका चॅप्टर १ चित्रपटातून लोकप्रिय झालेली दाक्षिणात्य अभिनेत्री कल्याणी प्रियदर्शन एका बॉलीवूड चित्रपटात एन्ट्री करणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. 'प्रलय' या हिंदी चित्रपटात अभिनेत्री दिसणार असल्याच्या चर्चा सुरू असतानाच आता अभिनेत्री कल्याणी प्रियदर्शन हिने प्रतिक्रिया दिली आहे. लोका चॅप्टर १ चित्रपटात अभिनेत्री कल्याणी प्रियदर्शन हिच्या अभिनयाने प्रेक्षकांना भुरळ घातली. बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई चित्रपटाने केली.

चित्रपट ओटीटीवर आल्यानंतर चित्रपटाला चांगला प्रतिसाद प्रेक्षकांनी दिला. आता अभिनेत्री प्रलय चित्रपटात दिसणार असल्याची चर्चा आहे. एका मुलाखतीत बोलताना अभिनेत्री कल्याणी प्रियदर्शन म्हणाली, मी नेहमीच म्हणत आले आहे की पटकथेच्या बाबतीत मी खूप लोभी अभिनेत्री आहे. जर चांगली पटकथा असेल, मग ती कोणत्याही भाषेत असो मराठी, हिंदी, कन्नड, तमिळ, तेलगू किंवा मल्याळममला ती हवी आहे. अशी प्रतिक्रिया तिने दिली आहे. त्यामुळे कल्याणीने हिंदी चित्रपटात कामकरण्याची इच्छा व्यक्त केल्याचे दिसत आहे. 'लोका चॅप्टर १' च्या यशानंतर हिंदी चित्रपटांच्या ऑफर्स वाढल्या आहेत का असा प्रश्न कल्याणीला विचारण्यात आला तेव्हा ती म्हणाली, 'ऑफर्स वाढल्या आहेत की कमी झाल्या आहेत हे मी सांगू शकत नाही, पण संधी नेहमीच होत्या.' लोका चॅप्टर १ हा मल्याळमभाषेतील सुपरहिरो चित्रपट आहे. २८ ऑगस्ट २०२५ रोजी हा प्रदर्शित झाला होता. चित्रपटाचे दिग्दर्शन डोमिनिक अरुण यांनी केले आहे आणि निर्मिती दुलकर सलमानने केली आहे. चित्रपटात नसलीन आणि सँडी यांच्यासह कल्याणी प्रियदर्शन, अरुण कुरियन, चंदू सलीमकुमार, निशांत सागर, रघुनाथ पालेरी, विजय राघवन, नित्या श्री दिसणार आहेत.



# अल्लू अर्जुन दिसणार वेगळ्याच रुपात

दाक्षिणात्य सिनेसृष्टीतील सुपरस्टार अभिनेता अल्लू अर्जुन हा कायम त्याच्या चित्रपटांमुळे चर्चेत असतो. त्याचे सिनेमे म्हणजे त्याच्या चाहत्यांसाठी रोमान्स, ॲक्शन आणि थ्रिलरची पर्वणी असते. यापुर्वी अल्लु अर्जूनच्या पुष्पा आणि 'पुष्पा-२' या या चित्रपटांना प्रेक्षकांचा भरभरून प्रतिसाद मिळाला. आता नुकतीच अल्लु अर्जूनच्या आगामी सिनेमाची खास घोषणा झालीय. या सिनेमात त्याचा आजवर कधीही न पाहिलेल्या अंदाज दिसणार यात शंका नाही. मकर संक्रांतीच्या निमित्ताने अभिनेत्याने चाहत्यांना हे अनोखं सरप्राईज दिलं आहे. पुष्पा-२ च्या मोठ्या यशानंतर अल्लू अर्जूनने चित्रपट निर्माते लोकेश कनगराज यांच्यासोबत हातमिळवणी केली आहे.या कोलॅबरेशनमुळे सिनेसृष्टीत उत्सुकता वाढली असून चित्रपटाबाबत अधिक माहिती जाणून घेण्यास प्रेक्षक उत्सुक आहेत. त्याच्या या आगामी चित्रपटाचं नाव 'ए२३' असं आहे. 'पुष्पा' फ्रँचायझीची निर्मिती करणाऱ्या मैत्री मूव्ही मेकर्स कंपनीने पोंगलच्या निमित्ताने एक लिमिटेड टीझर प्रदर्शित केला आहे. तो सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. अल्लू अर्जुनने त्याच्या सोशल मिडिया अकाउंटवर नव्या सिनेमाचा पहिला टीझर शेअर केला आहे. त्यामध्ये पाहायला मिळतंय की, सुरुवात एका सूर्योदयाच्या दृश्याने होते. ज्यामध्ये एक जंगल आणि तिथे अनेक प्राणी दिसत आहेत. अल्लू अर्जुन एका धगधगत्या आगीजवळ चालताना दिसतो. या घोषणेनंतर, अभिनेत्याचा आगामी चित्रपट चर्चेचा विषय बनला आहे. मात्र, चित्रपटाच्या प्रदर्शनाच्या तारखेबद्दल अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. २०२६ मध्येच या चित्रपटाच्या शूटिंगला सुरुवात करण्यात येणार आहे. दरम्यान, हा अल्लू अर्जुनच्या अभिनय कारकिर्दीतील २३ वा चित्रपट आहे. तर लोकेश कनगराज दिग्दर्शित करत असलेला हा सातवा सिनेमा आहे. सध्या अल्लू अर्जुन टलीच्या चित्रपटावर काम करत आहे, ज्यात दीपिका देखील प्रमुख भूमिकेत आहे. या चित्रपटाचं शूटिंग पूर्ण झाल्यानंतर अभिनेता या प्रोजक्टकडे लक्ष केंद्रित करणार आहे.



# रश्मिकाच्या 'मायसा'चा फर्स्ट लूक रिलीज

साऊथची अभिनेत्री रश्मिका मंदाना एकामागोमाग एक सुपरहिट सिनेमे देत आहे. हिंदी असो किंवा साउथ दोन्ही इंडस्ट्रीत तिचीच चर्चा आहे. 'पुष्पा २', 'सिकंदर', 'ॲनिमल' आणि नुकताच तिचा साउथमध्ये 'द गर्लफ्रेंड' रिलीज झाला. आता रश्मिकाला पुन्हा एकदा दमदार अंदाजात पाहायला मिळणार आहे. तिच्या आगामी 'मायसा' सिनेमातील पहिला लूक समोर आला आहे. रश्मिका मंदानाच्या बहुप्रतिक्षित 'मायसा' सिनेमाची पहिली झलक आली आहे. डोळ्यात आग, धारदार नजर, हातात बंदुक, चेहऱ्यावर रक्त असा तिचा खतरनाक लूक आहे. हा सिनेमा इलेक्ट्रिफाइंग अनुभव देणारा असणार आहे. दमदार ओपनिंग नरेशनसोबत रश्मिकाला 'मायसा' म्हणून प्रेझेंट केलं जाणार आहे. जळत्या जंगलाचा सीन आणि त्यासोबत चालणारा जबरदस्त बॅकग्राऊंड स्कोर मिळून एक अतिशय तीव्र आणि प्रभावशाली माहोल बनवणारा हा सिनेमा आहे. हा एक हाय ऑक्टेन इमोशनल ॲक्शन थ्रिलर आहे. गौंड समाजाचं सांस्कृतिक स्वरुप दाखवणारा हा सिनेमा आहे. रश्मिका यामध्ये एकदम नव्या अवतारात दिसणार आहे. यामध्ये ती गौंड महिलेची भूमिका साकारत आहे ज्यामध्ये राग, तीव्र भावना, ताकद दाखवण्यात येईल. तिची ही भूमिका न केवळ दमदार आहे पण भावनापूर्णही आहे. सिनेमा प्रेक्षकांवर नक्कीच छाप सोडेल अशी आशा मेकर्सने व्यक्त केली आहे. 'मायसा'चं दिग्दर्शन रवींद्र पुल्ले यांनी केलं आहे. तर अनफॉर्म्युला फिल्म्सने सिनेमाची निर्मिती केली आहे. सिनेमाची कहाणी आदिवासींची असल्याने त्यांच्याच परिसरात सिनेमाचं शूटही झालं आहे.





# लग्न टिकवण्यासाठी फक्त प्रेमपुरेसं नाही

मराठी अभिनेत्री अमृता खानविलकर कायम तिच्या स्पष्टवक्तेपणासाठी ओळखली जाते. सध्या अमृता तिच्या नवीन नाटकामुळे चर्चेत आहे. स्वप्नील जोशीसोबत ती 'लग्नपंचमी' या नाटकात दिसणार आहे. नुकतंच अमृताने एका मुलाखत दिली. यामध्ये तिने लग्न, घटस्फोट, मुला मुलीमधला संवाद यावर भाष्य केलं. नवीन पिढीला तिने मोलाचा सल्ला दिला. एका मुलाखतीत अमृता खानविलकर म्हणाली, लग्न हे फक्त त्या दोघांचं नसतं तर दोन कुटुंबही एकत्र आलेली असतात. मग जर मुलीच्या कुटुंबाला कशाची गरज असेल तर लेकीने मदत का करु नये? आजही फक्त सासरच्याच माणसांची काळजी घ्यायची असं का आहे? सासरच्या माणसांना दुखावूनही ती स्त्री काही करु शकत नाही. अर्धा जीव इकडे आणि अर्धा तिकडे असतो. जर तिने सासरच्या माणसांना समजावलं, त्यांच्याशी संवाद साधू शकली तर नक्कीच हे प्रश्न पडणार नाहीत. यासाठी मुलगा आणि मुलीने लग्नाआधीच यावर चर्चा करणं खूप गरजेचं आहे. फक्त प्रेमहे लग्नाला टिकवू शकत नाही. मुलगा आणि मुलगी कमावणारे असतील तर तुम्ही सगळ्या गोष्टींवर आधीच चर्चा करा. मुलं हवीत की नको, एकत्र कुटुंबात राहायचं की नाही, दोन्हीकडच्या पालकांना किती पैसे द्यायचे हे सगळं आधीच ठरवून घ्या. सध्या जे घटस्फोटाचं प्रमाण वाढतंय याचं कारण संवाद कमी असणं हेच आहे. संवाद हे मानवाला मिळालेलं सुंदर यंत्र आहे. आपल्याकडे बोलायला शब्द आहेत त्याचा वापर करा. नंतर उगाच काहीतरी होऊन बसणार, मग तुम्ही आणि कुटुंबीय डोक्याला हात लावणार यापेक्षा बोलून आधीच गोष्टी सांभाळा.

# मराठमोळी अभिनेत्री आमिरच्या सिनेमातून कमबॅक

सुमारे दहा वर्षांपूर्वी, सोशल मीडियाच्या सुरुवातीच्या काळात एका मुलीनं 'कप साँग'मुळे अचानक सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं होतं. तेव्हा 'कंटेंट क्रिएटर' ही संकल्पनाच फारशी अस्तित्वात नव्हती; पण तिचा हा व्हिडीओ प्रचंड व्हायरल झाला. 'कप साँग'मुळे चर्चेत आलेली मराठमोळी अभिनेत्री म्हणजे मिथिला पालकर. मिथिलासाठी इंटरनेट हे जरी करिअरची सुरुवात ठरलं असलं, तरी अभिनयातील मेहनत, संयम आणि सतत शिकण्याची वृत्ती यामुळे तिचा इंडस्ट्रीतला प्रवास घडत गेला. हा प्रवास तिला अनेक मराठीसह हिंदी सिनेमापर्यंत घेऊन गेला. आता ती आमिर खानच्या सिनेमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'हॅपी पटेल' या चित्रपटातून मिथिला प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. या चित्रपटात वीर दास प्रमुख भूमिकेत असून त्यानेच सह-दिग्दर्शन केलं आहे. आठ वर्षांनंतरचा थिएटरमध्ये प्रदर्शित होणारा हा तिचा पहिला हिंदी चित्रपट आहे. मिथिलासाठी हा केवळ कमबॅक नाही, तर एक नवी सुरुवात आहे. या सिनेमाच्या सेटवरील खास अनुभव तिनं शेअर केला आहे. एका मुलाखतीत मिथिलाला 'पहिला मोठा कॉमेडी सिनेमा असल्यामुळे भीती वाटली का?' असं विचारण्यात आलं. यावर ती म्हणाली, हो, नक्कीच. कॉमेडी करणं भीतीदायक असतं. पण वीर दासचं मार्गदर्शन खूप उपयोगी ठरलं. 'हॅपी पटेल'मधील पात्रं प्रेक्षकांना अतिशयोक्ती वाटू शकते, पण आमच्यासाठी ते वास्तव आहे. यानंतर तिने शूटिंगचा अनुभव सांगितला की, या सेटवर एक नियम होता. तो म्हणजे मोबाईल फोन वापरायचे नाहीत. हे फारच क्वचित घडतं. हा चित्रपट बनवताना टीम म्हणून काहीतरी छान करत असल्याची भावना होती, ती इथे मुद्दाम तयार करावी लागली. नाटक करताना हे सहज घडतं, पण सिनेमात तसं क्वचित होतं. पुढे ती म्हणते, आजकाल मोबाईलमुळे सगळे आपापल्या जगात असतो. सेटवर बसून गप्पा मारणं कमी झालंय. इथे मात्र मोबाईलवर सतत लक्ष न देता आम्ही सर्व कलाकारांनी एकमेकांबरोबर चांगला वेळ घालवला. आम्ही एकत्र गाणी म्हणायचो, खेळ खेळायचो. सगळेच खाण्याचे शौकीन होतो, त्यामुळे जेवण, संगीत अशा गप्पा रंगायच्या. व्हॅनिटीचे दरवाजे उघडले की, एक मोठा ग्रुप असल्यासारखं वाटायचं. यानंतर तिनं सांगितलं, आमच्याकडे वैयक्तिक टीम्स नव्हत्या. सगळे एकच व्हॅनिटी व्हॅन वापरायचे. सामान्यपणे प्रत्येक कलाकाराची वेगळी हेअर-मेकअप टीम असते. इथे मात्र एकच कॉमन टीम होती. त्यामुळे खरंच फक्त कलाकार आणि क्रू मेंबर्स यांच्यात एक चांगलं वातावरण होतं. दरम्यान, 'हॅपी पटेल'मध्ये मिथिला पालकसह मोना सिंग, शरीब हाश्मी हेही आहेत. आमिर खाननं सिनेमाची निर्मिती केली आहे.





# प्रियदर्शिनी 'या' सिनेमातून येणार भेटीला

प्रियदर्शिनी इंदलकर ही अभिनेत्री 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या विनोदी कार्यक्रमातून घराघरांत पोहोचली. तिच्या अभिनयाचा चाहतावर्ग मोठा असल्याचे दिसते. तिच्या 'रुखवत', 'दशावतार' या मराठी चित्रपटांचे कौतुक झाले. तिच्या भूमिकांना विशेष पसंती मिळली. आता अभिनेत्री प्रियदर्शिनी इंदलकर लवकरच एका नवीन चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. यामध्ये तिच्याबरोबर अभिनेता अभिजीत आमकर प्रमुख भूमिकेत दिसणार आहे. 'लग्नाचा शॉट' असे या चित्रपटाचे नाव आहे. या चित्रपटाचा टीझर प्रेक्षकांच्या भेटीला आला आहे. यामध्ये पाहायला मिळते की अभिजीत म्हणतो की लग्नाच्या बाबतीत काय फक्त मुलींचीच स्वप्नं असतात का? मुलांची सुद्धा स्वप्नं असतात. होणाऱ्या बायकोबरोबर थोडा वेळ घालवावा. तिला जवळून ओळखावं. टीझरमध्ये पुढे पाहायला मिळते की एक ट्रेन जात आहे. त्या ट्रेनच्या दरवाज्याजवळ अभिजीत आहे. ट्रेनमध्ये चढण्यासाठी प्रियदर्शिनी पळत असल्याचे पाहायला मिळत आहे. तिला पळताना पाहून अभिजीत तिला हात देतो. ते दोघेही नवरा- नवरीच्या वेशभूषेत दिसतात. प्रियदर्शिनी म्हणते की, तुम्हा मुलांचा काही भरवसा नाही. प्रियदर्शिनी अभिजीतला विचारते, तुझं नाव काय रे? त्यावर तो म्हणतो, पळून आलेला नवरा. तो तिला तुझं नाव काय आहे, असं विचारतो. त्यावर प्रियदर्शिनी म्हणते, भाग के आयी हुई दुल्हनियां असे सांगते. पुढे ते इकडे तिकडे पळताना दिसतात. अभिजीत प्रियदर्शिनीला म्हणतो की, माझ्यावर विश्वास ठेव, देवाचा नक्कीच काहीतरी प्लॅन आहे. प्रियदर्शिनी म्हणते की, माझ्यावर विश्वास ठेव, देवाचा असला तरी माझा नाहीये. शेवटी लग्नाचा शॉट हे गाणं ऐकायला मिळत आहे. चित्रपटात अभिजीत आणि प्रियदर्शिनीच्या पात्रांची नावे काय आहेत, गोष्ट नेमकी कुठे घेऊन जाणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. तसेच, आणखी कोणते कलाकार दिसणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे. दरम्यान, प्रियदर्शिनी इंदलकर महाराष्ट्राची हास्यजत्रामधून लोकप्रिय ठरली. तर अभिजीत आमकर सध्या तू ही रे माझा मितवामध्ये प्रमुख भूमिकेत दिसत आहे.

# 'हमराज २' मध्ये' दिसणार पुन्हा ती जोडी?

बॉलिवूड अभिनेता अक्षय खन्ना सध्या 'धुरंधर' चित्रपटामुळे प्रसिद्धीझोताता आहे. आदित्य धर दिग्दर्शित या चित्रपटातील त्याच्या कामाचं सगळेच कौतुक करत आहेत. 'धुरंधर' नंतर अक्षय खन्नाला चांगलाच स्टारडममिळाला आहे. असंच काहीसं 'ॲनिमल' नंतर बॉबी देओलच्या बाबतीत घडलं होतं. त्यामुळे चाहत्यांमध्ये या दोन नावांची प्रचंड क्रेझ आहे. अशातच मागील काही दिवसांपासून अक्षय खन्ना आणि बॉबी देओलाचा हमराज सिनेमाचा सीक्वल येणार अशी चर्चा होत पसरली होती. त्यामुळे सिनेरसिक देखील प्रचंड उत्सुक आहेत. आता या चर्चांवर खुद्द चित्रपटाच्या निर्मात्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. २००२ साली अब्बास-मस्तान या दिग्दर्शित 'हमराज' हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटात अक्षय खन्ना, अमिषा पटेल आणि बॉबी देओल यांच्या प्रमुख भूमिका होत्या. हमराजमध्ये अक्षय खन्ना करण मल्होत्राच्या नकारात्मक भूमिकेत दिसला होता. धुरंधरमधील त्याच्या खलनायकाच्या भूमिकेने प्रेक्षकांना हमराजची





आठवण करुन दिली. त्यानंतर हमराजचा सीक्वल येणार का याची प्रेक्षकांमध्ये तुफान चर्चा रंगली. अलिकडेच चित्रपट निर्माते रतन जैन यांना एका मुलाखतीत चित्रपटाच्या सीक्वलबाबत विचारण्यात आलं. त्या प्रश्नाचं उत्तर देत ते म्हणाले, जर मला या दोन कलाकारांसाठी उत्तमस्क्रिप्ट मिळाली, तर मी 'हमराज २' नक्की बनवेन. आम्हाला अशी कथा हवी आहे, ज्यात ते दोघेही चपखल बसतील आणि त्यांच्या वयाला साजेशा त्या भूमिका असतील. या मुलाखतीत निर्माते रतन जैन यांनी अक्षय खन्ना आणि बॉबी देओलसोबत काम करण्याचा अनुभव सुद्धा शेअर केला. तेव्हा ते म्हणाले, बॉबीसोबत काम करायला मजा येते. अक्षयच्या बाबतीतही तेच आहे. या प्रचंड यशानंतर अक्षयला थोडं सेटल होऊ द्या. मी त्याला भेटण्याचा प्रयत्न करेन. त्याला अधिक चांगले चित्रपट मिळायलाच हवेत. असा खुलासा त्यांनी केला.

# भूमी पेडणेकरने केले ४० किलो वजन कमी



अनेकांसाठी वाढलेले वजन ही त्यांची सर्वात मोठी समस्या असते. अनियमित जेवणाच्या, झोपण्याच्या वेळा, असंतुलित आहार, व्यायामाचा अभाव आणि तज्ज्ञांचा सल्ला न घेणे अशा अनेक गोष्टींचा समावेश असतो. विविध क्षेत्रातील विविध कामाच्या वेळा यामुळे त्याचा जीवनशैलीवर परिणाम होतो. तसेच, अलीकडे जंक फूड खाण्याचे प्रमाणदेखील वाढले आहे. याबरोबरच कमी प्रमाणात पाणी पिण्याचादेखील शरीरावर परिणाम होत असतो. अशा अनेक गोष्टींमुळे अनेक आजार बळावतात. तसेच अनेकांना वजन कमी होणे, वजन वाढणे यासारख्या समस्यांचा सामानादेखील करावा लागतो. बॉलीवूडमधील अनेक कलाकार त्यांनी कसे वजन कमी केले याबद्दल खुलासा करतात. अनेकदा नेटकरी कलाकारांनी ओझेम्पिकसारखी औषधे घेऊन वजन कमी केल्याचे म्हणतात. आता भूमी पेडणेकरने तिने कसे वजन कमी केले आणि औषधांच्या मदतीने वजन कमी करणाऱ्यांबद्दल तिचे मत काय आहे, हे सांगितले आहे. भूमी पेडणेकरणे नुकतीच सोहा अली खानच्या पॉडकास्टमध्ये हजेरी लावली होती. यावेळी तिने तिची फिटनेस जर्नी सांगितली. ती म्हणाली की मला जीममध्ये व्यायामकरणे आवडायचे नाही. अक्षय कुमारने स्ट्रेंथ ट्रेनिंगची ओळख करून दिली. माझ्या आयुष्यात असाही काळ आला जेव्हा मी खूप व्यायाम करायचे. त्याला कोणतेही बंधन नव्हते. त्यादरम्यान मी आजारी पडले होते. त्यानंतर मी माझ्या जीवनशैलीत खूप बदल केला. भूमी असेही म्हणाली की मी गेल्या दहा वर्षात मी माझी जीवनशैली बदलली आहे. आता मी खाणे आणि व्यायामयाकडे व्यवस्थित लक्ष देते. योग्य प्रमाणात या गोष्टी करते. हे खूप महत्वाचे आहे. आता मी फक्त ४०-४५ मिनिटे व्यायाम करते. आधी मी २ ते ३ तास व्यायाम करायचे. भूमीने असेही सांगितले की ती दोन वेळा जेवण करते. इतरवेळी ती काहीही खात नाही. तसेच ती मांसाहर कमी करते, ती शाकाहारी आहे. तसेच तिच्या आहारात दूधाचे प्रमाणदेखील कमी असते. भूमीने असेही म्हणाली की एका पात्रासाठी मी खूप वजन कमी केले होते. मी दवाखान्यात होते. कारण मला डेंग्यू झाला होता. त्यावेळी १२ किलो वजन कमी झाले होते. माझे अर्धे केस गळाले होते. त्या वेदना असह्य होत्या. त्यावेळी लोक मला विचारायचे की मी ओझेम्पिकसारखी औषधे घेऊन वजन कमी केले आहे. पण मी वजन कमी करण्यासाठी दहा वर्षे मेहनत घेतली आहे. योग्य प्रकारे खात आहे. योग्य प्रमाणात व्यायाम करते, परिणामी माझे वजन कमी झाले आहे. ती असेही म्हणाली, मला असेही लोक माहित आहेत की जे औषधे घेऊन वजन कमी करत आहे. पण, त्यांना त्याची गरज आहे. मी कोणालाही जज करत नाही. प्रत्येकाची एक जगण्याची पद्धत असते. पण हे खरे आहे की मी कोणतेही औषधे घेतल्याशिवाय ४० किलो वजन कमी केले आहे, असे तिने सांगितले.



# इंडस्ट्रीत आजही हिरोची पूजा केली जाते

हिंदी चित्रपट 'मद्रास कॅफे'मधून अभिनय क्षेत्रात पदार्पण करणारी राशि खन्ना आज पॅन इंडिया अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. गेल्या दहा वर्षांत तिने केवळ हिंदीच नव्हे, तर तमिळ आणि तेलुगू सिनेसृष्टीतही स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. २०२५ मध्ये तिचे तीन चित्रपट प्रदर्शित आले असून, आणखी चार चित्रपट येत्या काळात प्रदर्शित होणार आहेत. राशि सांगते की, ती दिल्लीमध्ये वाढली, मुंबईत करिअरची सुरुवात केली आणि आता हैदराबादमध्ये स्थायिक झाली आहे. कधी- कधी मला वाटतं मी नेमकी कोण आहे, कारण वेगवेगळ्या भाषांमधील आणि प्रदेशांतील भूमिका करताना मी त्या पात्रातच रमून जाते, असं ती हसत सांगते.

मुंबईबद्दल बोलताना ती म्हणते की, तिथली सुरक्षितता खूप आवडते. रात्री उशिराही ऑटोने फिरता येतं. मी आजही कधी कधी ऑटोने फिरते, जरी माझा मॅनेजर नकार देत असला तरी, असं ती सांगते. 'मद्रास कॅफे'नंतर हिंदीतच काम करण्याचा विचार होता का, यावर राशि म्हणते की, तिला कधीच स्टार बनायचं होतं असं वाटलं नव्हतं. मला अभिनयाची फार आवडही नव्हती. सेटवर काम करायला आवडलं म्हणून मी पुढे कामकरत गेले. पहिली तेलुगू फिल्म मिळाली आणि तिथूनच तिचा प्रवास पुढे सुरू झाला. फिल्मी पार्श्वभूमी नसताना इंडस्ट्रीत टिकून राहणं कठीण होतं का, यावर राशि म्हणते, इंडस्ट्रीतले असाल तरीही काम कायम मिळेल याची खात्री नसते. बाहेरून आलेल्या कलाकारांना जास्त मेहनत घ्यावी लागते, हे खरं आहे. पण मी कधीही स्वतःला विक्टिम मानलं नाही. रिजेक्शन आलं तरी ते या व्यवसायाचा भाग आहे, असं समजून घेतलं. राशिला खाण्याची खूप आवड आहे. मात्र, अभिनेत्री झाल्यानंतर आहारात बदल करावे लागले. मी स्वतःला उपाशी ठेवत नाही. क्रॅश डायटवर माझा अजिबात विश्वास नाही. हेल्दी खाल्लं तर सगळं बॅलन्स राहतं, असं ती सांगते. मिठाई आणि समोसे तिला फार आवडतात, पण आता ती त्यावर नियंत्रण ठेवते. इंडस्ट्रीतील असमानतेबद्दल बोलताना राशि म्हणते, आपला समाजच पितृसत्ताक आहे. त्यामुळे इंडस्ट्रीतही हिरोला जास्त महत्त्व दिलं जातं. पण आता परिस्थिती बदलतेय, कारण मुली बोलू लागल्या आहेत. पूर्ण बदल होण्यासाठी वेळ लागेल, पण बदल नक्की होईल, असा विश्वास तिने व्यक्त केला.

'चीन और अरब हमारा, हिंदुस्था हमारा रहेनेको घर नही है, सारा जहाँ हमारा ।।' १९५८ सालच्या 'फिर सुबह होगी' चित्रपटातील साहिर यांचे विद्रोही बोल राज कपूर या अभिनयकर्त्याने पडद्यावर अतिशय सोशिकपणे, शोषितांवर कणव न दाखविता व्याजस्तुती प्रकाराने, दुःखितांची पीडा चेहर्‍यावरील जबराईच्या समाधानाने अभिनित करून एक प्रकारे समाज व्यवस्थेची लक्तरे काढली आहे. 'जितनी भी बिल्डिंगे थी। सेठोणे बाट ली है फुटपाथ बम्बईके। है आशिया हमारा' समाजातील विषमतेवर कारुण्याला पाझर फोडणार्‍या शब्दांनी हसत हसत डागण्या देणारा अभिनय केवळ राज कपूरच करू शकले.

# सामाजिक विषमतेचा प्रहारीः राज कपूर



'वतन 'मिल जुल के इस वतन को। ऐसा सजाएंगे हम हैरत से मुह तकेगा। सारा जहाँ हमारा' या आधीच राज कपूर वरील व्यवस्थेने व्यथित होते. म्हणूनच 'श्री ४२०' मध्ये ते दाखवू शकले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर निर्वासितांचे लोंढे भारतभर आसरा शोधू लागले. काहींनी फूटपाथचा आसरा घेतला. अशाच एका फूटपाथवर आश्रय मिळावा म्हणून खेड्यातून आलेले राज फूटपाथवरील लोकांना विनवू लागले. फूटपाथवर राहण्यासाठीही किराया पडतो, याचे त्यांना नवल वाटले. त्यातील एक म्हणाले, **ये मामुली फुटपाथ नही है, देखी नही बाजू मे सेठ सोनाचंद धरमानंद की हवेली है। ओ जब खाना खाते है तो एकसे एक भारी चावल और व्यंजनोकी खुशबू यहातक आती है। आधा पेट तो उसीसे भर जाता है।**

**दुसरा प्रसंगः** मुंबईच्या गर्दीत धक्के खात जाताना त्यांना पैशासाठी आपले चांदीचे पदक विकण्यासाठी कुणीही मार्गदर्शन करीत नाही. शेवटी एका भिकार्‍याला विचारतो. तोही म्हणतो, चल हट! धंदेका टाइम है। राज खाली पडतात. उठताना म्हणतात, यहाँ भिकारी को भी धंदेका टाइम होता है. मुंबईतील गरिबांसाठी १०० रुपयात घराची जाहिरात पाहून गरिबांची लाईन लागते. त्यातच ललिता पवार या गरीब केळेवालीचा नंबर येतो, ती आपल्या पोतडीतून पैसे काढते. आत काऊन्टरवर राज बसलेले असतात. ती म्हणते, बेटा, मेरे पास ९७ रु. १२ आणे है, कुछ पैसे कम है. भलेही एखाद खिडकी कम लगाना, लेकिन मेरे लिये मकान बनाना।। ललिता पवार या कसलेल्या अभिनेत्रीचा अभिनय, संवादातील कणव यामुळे व्यथित राजच्या चेहर्‍यावरील करून हावभाव केवळ काळीज चिरून जाणारे होते. वयाच्या २४ वर्षी स्वतःची प्रॉडक्शन कंपनी काढून 'आग' हा चित्रपट १९४८ साली काढला. खरे प्रेम केवळ सौंदर्य वा कुरूपतेवर अवलंबून नसते, हा संदेश यात दिला आहे. नर्गिस यांच्या सोबतचा हा पहिला चित्रपट होता.

'जिंदा हूँ इस तरह की गमे जिंदगी नही' मुकेशच्या दर्दभर्‍या सुरांनी प्रसवलेला पाझर राज यांनी कौशल्याने अभिनयातून प्रवाहित केला. तेव्हापासूनच मुकेश हे राज कपूरचा आवाज बनले. आर. के. प्रॉडक्शनचा प्रत्येक चित्रपट, सामाजिक आशय व जीवन संदेश देऊनच जन्मास घातला. 'जॉन चाचा तुम कितने अच्छे तुम्हे प्यार करते सब बच्चे'१९५५ साली लहान मुलांच्या भाबड्या कल्पनांना आकार देणारा आर. के. प्रॉडक्शनचा 'बुटपॉलिश' चित्रपट राज कपूर या भाववेड्या कलाकाराच्या भावविश्वातले अप्रतिम लेणे होते. जॉन चाचा (डेव्हिड) व दोन भाऊ बहीण, यांच्या भोवती पूर्ण कथानक आहे. लहान मुलगा (भाऊ) बुटपॉलिश करून काही पैसे जमा करतो व बहिणीला एक आधीच पाहून ठेवलेला फ्रॉक घेऊन द्यायचे स्वप्न बघतो. चाचाला हे सांगतो. निरागस बालकाच्या दृष्टीत जमलेल्या केवळ चार आण्यात बहिणीची हौस पुरविण्याची आस बघून चाच्याचे हृदय भरून येते. त्यांचे नेत्रातील करुण भाव, दुःखाचा आवंढा व सुस्कारा, अप्रतिम अभिनयाचे उदाहरण होते. याला म्हणतात अभिनय व राज यांचे दिग्दर्शन. 'जागो मोहन प्यारे! जागो...'

१९५६ साली बंगाली भाषेतील 'एक दिन रात्रे' या चित्रपटावरून हिंदीत 'जागते रहो' चित्रपट काढला. खेड्यातून शहरात आलेल्या एका इसमाला रात्रभर फिरून काय काय प्रसंग बघावयास मिळाले. शहरी सुशिक्षित लोकांच्या रात्रीच्या जीवन पद्धतीला कंटाळून ते पहाटे गावी जायला निघतात तेव्हा गावाबाहेरील एका घरासमोरील बागेत नर्गिस झारीने झाडांना पाणी घालताना गाणे म्हणताना त्यांच्या कानी पडते. ते तिच्याजवळ जातात. हाताची ओनजळ मुखाजवळ नेवून 'पानीऽऽ' एवढेच म्हणतात.

नर्गिस त्याना पाणी पाजते. संपूर्ण चित्रपटात राज कपूरला एकही संवाद नाही. राज व नर्गिस यांच्या प्रणयी जीवनातला हा शेवटला चित्रपट ठरला. १९६४ साली 'संगम' या चित्रपटात प्रेमाचा त्रिकोण खुबीने साकार केला. जन्मभर उराशी बाळगलेले स्वप्न साकार करण्यासाठी, आपले सर्वस्व पणास लावून १९७१ साली 'मेरा नाम जोकर' हा अतिशय भव्य चित्रपट काढला. जोकर हा अपघाताने उंचावरून खाली पडून विव्हळतो, तरी दर्शकांना तो त्याने केलेला विनोद वाटतो. सर्कशीतल्या जोकरच्या जीवनातले शल्य व कारुण्य निचोडून पडद्यावर प्रदर्शित करण्याचे कसब व जोकरच्या भूमिकेतील जगावेगळा अभिनव व दुर्लभ अभिनय पडद्यावर बघितल्यावर राज कपूर यांच्यातील श्रेष्ठ अभिनेता कळतो. काळानुरूप दर्शकांच्या अभिरुची जाणून ते स्वतः बदलले. टीनएजर नायक व नायिका यांच्या कथानकावर आधारित रोमँटिक 'बॉबी' चित्रपट बनवून राज कपूर यांचे नव्या दमातील नवे रूप दर्शकांना पाहावयास मिळाले. प्रेक्षकांच्या आवडीनिवडी बघून व काळाचा रोख ओळखून, त्या प्रकारच्या कथेवर थोडासा आवश्यक भडकपणा ओतून 'सत्यम शिवम सुंदरम', 'प्रेमरोग','राम तेरी गंगा मैली' अशा यशस्वी चित्रपटांची मालिका उतारवयात काढली. शेवटपर्यंत आपल्यातील महान दिग्दर्शक जागृत ठेवला. राज कपूर यांना फिल्म फेअर अवॉर्ड सहा वेळा तसेच पद्मभूषण पुरस्कार (१९७१), दादासाहेब फाळके पुरस्कारही (१९८७). मिळाला. नवीन युगाचे प्रवर्तक, सामाजिक विषमतेचे प्रहारी राज कपूर २ जून १९८८ रोजी दिल्ली मुक्कामी कैलासवासी झाले.

**रमेश पोफळी**

# कॉकटेल २ चे मोशन पोस्टर रिलिज




अभिनेता कॉकटेल नावाचा चित्रपट २०१२ मध्ये प्रदर्शित झाला होता. हटक्या कथानकामुळे चित्रपटाने प्रेक्षकांच्या पसंतीची पोचपावती मिळवली गेल्या काही वर्षांपासून कॉकटेल चित्रपटाचा सिक्वल येणार असल्याच्या चर्चांना उधाण आले होते. अखेर आता कॅकटेल चित्रपटाच्या सिक्वलचे पहिले पोस्टर सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. पोस्टर पाहिल्यानंतर चित्रपटाची उत्सुकता वाढली आहे. कॉकटेलच्या पहिल्या भागात अभिनेता सैफ अली खानसोबत अभिनेत्री दीपिका पादुकोन आणि अभिनेत्री डायना पेंटी झळकली होती. मैत्रीवर आधारित असणाऱ्या या चित्रपटात या तिन्ही कलाकारांच्या अफलातून परफॉर्म्सने प्रेक्षकांना थक्क करून सोडले.

चित्रपटाच्या कथानकासोबतच असणारी सगळीच गाणी हिट ठरली. ३० कोटी रुपयांच्या कमी बजेटवर तयार झालेल्या या चित्रपटाने तब्बल १०० कोटी रुपयांहून अधिकची कमाई केली. आता दुसऱ्या भागासाठी अर्थात सिक्वलसाठी चाहते उत्सुक आहेत. कॉकटेल दोनच्या पोस्टरमधून चित्रपटातील आधीच्या कलाकारांची जागा आता दुसऱ्या कलाकारांनी घेतली आहे.

अभिनेता शाहिद कपूर, अभिनेत्री क्रिती सॅनेन आणि नॅशनल क्रश रश्मिका मंदानी हे कलाकार कॉकटेल २ मध्ये झळकणार आहेत. चित्रपटाचा सिक्वल तब्बल १३ वर्षांनंतर चाहत्यांच्या भेटीसाठी येण्यास सज्ज झाला आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या पोस्टरमध्ये शाहिद, क्रिती आणि रश्मिका हे तिघेही एका समुद्र किनाऱ्यावर मनोसोक्त आनंद लुटताना दिसत आहेत. पोस्टरमधून चित्रपट प्रदर्शनाची नेमकी तारीख जाहीर करण्यात आली नसली तरी पोस्टरमध्ये कॉकटेल राऊंड २ असे लिहिले असून, हा चित्रपट ऑगस्ट २०२६ मध्ये प्रदर्शित होणार आहे. सोशल मीडियावर पोस्टर व्हायरल झाल्यानंतर नेटकर्‍यांच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया समोर आल्या आहेत. अधिकृतरित्या चित्रपटाचे पोस्टर टीम कडून शेअर करण्यात आलेले नाही.

# 'हक'नंतर यामी गौतमचा नवा प्रयोग




बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतमने गेल्या काही वर्षांत निवडक पण दर्जेदार चित्रपट दिले आहेत. तिच्या अभिनयाचं सर्वत्र कौतुक होत असून, तिचे चित्रपट बॉक्स ऑफिसवरही चांगली कमाई करत आहेत. या यशाच्या जोरावर यामी आता थोडा वेगळा आणि हलका-फुलका प्रयोग करण्याच्या तयारीत आहे. 'हक'नंतर आता ती हॉरर-कॉमेडी चित्रपटात मुख्य भूमिकेत दिसणार आहे. यामी याआधी अर्जुन कपूर आणि सैफ अली खान यांच्या 'भूत पोलिस' या चित्रपटात दिसली होती. मात्र, त्यात तिची भूमिका दुय्यम होती. आता मात्र ती 'नवी नवेली' या चित्रपटातून लीड रोलमध्ये प्रेक्षकांसमोर येणार आहे. 'नवी नवेली' या चित्रपटाची खास बाब म्हणजे त्याची कथा भारतीय पुराण कथांशी जोडलेली आहे. सध्या प्रेक्षकांना हॉरर-कॉमेडी प्रकार खूप आवडतो आहे. याआधी श्रद्धा कपूरची 'स्त्री २' आणि शर्वरी वाघची 'मुंज्या' या चित्रपटांनी मोठी कमाई केली आहे. त्यामुळे यामी गौतमचाही हा प्रयोग चर्चेत आहे. या चित्रपटाची कथा दिव्य निधी शर्मा यांनी लिहिली आहे. त्यांनी या आधी 'सितारे जमीन पर', 'लापता लेडीज' आणि 'हीरामंडी'सारख्या प्रोजेक्ट्सवर काम केलं आहे. चित्रपटाचे निर्माते आनंद एल राय असून, यामी त्यांच्यासोबत याआधी 'नखरेवाली' चित्रपटात काम करत होती. 'नवी नवेली'चं शूटिंग फेब्रुवारी २०२६ पासून सुरू होणार आहे. यामीच्या अभिनयाची झलक तिच्या मागील चित्रपटांतून दिसून आली आहे. ओटीटीवरील अ थर्सडे'ला प्रतिसाद दिला. आर्टिकल ३७०, चोर निकलकर भागा आणि ओएमजी २ मध्येही तिच्या कामाचं कौतुक झालं. आर्टिकल ३७० आणि 'ओएमजी २'ने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केली. 'हक'नंतर आता 'नवी नवेली'मधून यामी काय कमाल करते, याकडे लक्ष लागलं आहे.

# हृतिकच्या 'या' सिनेमाचा येतोय सीक्वल?



बॉलीवूडचा 'ग्रीक गॉड' हृतिक रोशनच्या सुपरहिट चित्रपटांपैकी एक असलेल्या 'क्रिश' सिनेमाचा पुढचा भाग अर्थात 'क्रिश ४'ची सध्या चांगली तयारी सुरु आहे. पण 'क्रिश ४'ची चर्चा सुरु असतानाच हृतिक रोशनच्या गाजलेल्या चित्रपटाचा एक सीक्वल प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याची शक्यता निर्माण झाली आहे. या सिनेमाचं नाव आहे 'काबिल'. २०१७ मध्ये प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या सिक्वलची, म्हणजेच 'काबिल २'ची तयारी सुरू झाल्याचे संकेत मिळत आहेत. २०१७ मध्ये प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर प्रदर्शित झालेल्या 'काबिल' चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली होती. या चित्रपटात हृतिक रोशन आणि यामी गौतम यांनी अंध जोडप्याची भूमिका साकारली होती. हृतिकच्या अभिनयाचे प्रचंड कौतुक झाले होते. आता तब्बल ८ वर्षांनंतर या चित्रपटाचा दुसरा भाग येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नुकतेच दिग्दर्शक संजय गुप्ता यांनी त्यांच्या सोशल मीडिया हँडलवर एक पोस्ट शेअर केली. यामध्ये त्यांनी 'काबिल' चित्रपटाच्या यशाबद्दल आणि त्यातील पात्रांबद्दल भाष्य केले. एका युजरने जेव्हा त्यांना 'काबिल २' बद्दल विचारले, तेव्हा गुप्ता यांनी सकारात्मक प्रतिसाद देत चाहत्यांच्या उत्सुकता शिगेला पोहोचवली. त्यांच्या या प्रतिक्रियेमुळे काबिल २' लवकरच पडद्यावर येईल, अशी चर्चा रंगू लागली आहे. 'काबिल' चित्रपटात हृतिकने 'रोहन भटनागर' ही अंध व्यक्तिरेखा साकारली होती, जो आपल्या पत्नीच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी कोणत्याही थराला जातो. चित्रपटाचा शेवट असा झाला होता की त्यात सिक्वलसाठी वाव होता. आता 'काबिल २' मध्ये कथा पुढे कशी जाणार आणि हृतिक पुन्हा एकदा त्याच ताकदीने पडद्यावर दिसणार का, याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

# अजय देवगणच्या 'तान्हाजी - द अनसंग वॉरियर'चा दुसरा भाग येणार?



या वर्षात अनेक बॉलीवूड सिनेमांचे सीक्वेल येणार आहेत. त्यांची सर्वांनाच उत्सुकता आहे. अशातच आता यात आणखी एका सिनेमाची भर पडणार आहे. तो सिनेमा म्हणजे अजय देवगणचा 'तान्हाजी- द अनसंग वॉरियर'. अजय देवगणच्या काही गाजलेल्या सिनेमांपैकी हा एक सिनेमा होय. त्यात अभिनेता अजय देवगणनं शूर वीर तानाजी मालुसरेंची भूमिका साकारली होती. या सिनेमातून तानाजी मालुसरेंची शौर्यगाथा सांगण्यात आली होती. २०२० साली प्रदर्शित झालेला हा ऐतिहासिक चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट ठरला होता. या सिनेमाला नुकतीच सहा वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त कलाकारांनी पोस्ट शेअर केल्या होत्या. त्यामध्ये अभिनेता शरद केळकरनंही इन्स्टाग्रामवर पोस्टर शेअर करीत आपल्या भावना व्यक्त केल्या. या पोस्टसह त्यानं 'तान्हाजी- द अनसंग वॉरियर'ला सहा वर्षे पूर्ण झाली. किती अद्भुत अनुभव होता जय भवानी, जय शिवाजी, असं लिहिलं आहे. अभिनेता अजय देवगणनंसुद्धा खास पोस्ट शेअर केली आहे. दरम्यान, अजय देवगणनंही सिनेमाला सहा वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त इन्स्टाग्रामवर खास पोस्ट शेअर केली आहे. या पोस्टमध्ये चित्रपटातील वेगवेगळ्या दृश्यांची पेंटिंग स्वरूपातील पोस्टर्स शेअर करण्यात आली आहेत. त्यामध्ये अजय देवगणसह काजोल, सैफ अली खान व शरद केळकर यांचीही पोस्टर्स दिसत आहेत. या पोस्टसह अजय देवगनच्या कॅप्शनने सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलंय. त्यानं मराठीत 'गड आला; पण सिंह गेला' अशी ओळ लिहीत पुढे पण गोष्ट अजून संपलेली नाही, असं म्हटलं आहे. त्याच्या या कॅप्शनमुळे 'तान्हाजी- द अनसंग वॉरियर'च्या दुसऱ्या भागाबाबत चर्चा सुरू झाली आहे. अर्थात, या चर्चा आहेत. त्याबद्दल अजून कुठलीच अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही; पण जर या सिनेमाचा दुसरा भाग आला, तर अनेकांना तो पाहायला आवडेल. दरम्यान, 'तान्हाजी- द अनसंग वॉरियर' सिनेमानं बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कामगिरी केली होती. या चित्रपटानं जगभरात सुमारे ३६७.६५ कोटी रुपयांची कमाई केली आणि 'तान्हाजीर- द अनसंग वॉरियर' हा २०२० मध्ये सर्वाधिक कमाई करणाऱ्या हिंदी आणि भारतीय चित्रपटांपैकी एक ठरला होता.